# पोलीस उप आयुक्त परिमंडळ - १
# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट ता. २७/०५/२०२३

### एम.आय.डी.सी भोसरी पोलीसांकडुन गहाळ झालेले महागडे ३० मोबाईल व चोरीच्या गुन्हयातील सोन्याचे दागिने हस्तगत करुन मुळ मालकांना केले परत

### (एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशनची कारवाई)

एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन कडील गहाळ झालेले एकुण ३० मोबाईलचा तांत्रिक विश्लेषणा द्वारे शोध घेवुन सॅमसंग, ओपे, विवो, वनप्लस, रेडमी रिअलमी असे एकुण ३,८५,०००/- रुपये किंमतीचे मोबाईल हस्तगत केले आहे.

दि. ११/०५/२०२३ रोजी एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन येथे मा. पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ - १ पिंपरी चिंचवड यांचे पोलीस स्टेशन येथील मासीक भेट दरम्यान गहाळ झालेल्या एकुण ३० मोबाईलचे व सोन्याचे दागिने तक्रारदार यांना एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन येथे समक्ष बोलावुन मा. विवेक पाटील पोलीस उप आयुक्त सो. परिमंडळ - १ पिंपरी चिंचवड यांचे हस्ते गहाळ मोबाईल तसेच एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन कडील चोरीच्या दोन गुन्हयातील २० ग्रॅम वजनाचे १,००,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने फिर्यादींना परत देण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी **मा.श्री.विनयकुमार चौबे सो**. पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, **मा.श्री.संजय शिंदे** सो., सह.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, **मा.श्री विवेक पाटील** सो. पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड, **श्रीमती प्रेरणा कट्टे** सो. सहा. पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड, **राजेंद्र निकाळजे** वरिष्ठ पोलीस निरीक्षक एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अनिल जोशी यांनी मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करुन **सचिन चव्हाण**, पोलीस उप निरीक्षक **पोलीस अंमलदार** चंद्रकांत गवारी, स्वप्नील शेलार, संजय जरे, गणेश बोऱ्हाडे, राहुल लोखंडे, शरद गांधिले, भागवत शेप, नितीन खेसे, विशाल काळे, अनिकेत कांबळे, उषा होले एम.आय.डी.सी भोसरी पोलीस स्टेशन यांनी सदर उल्लेखनिय कामगीरी केली आहे.

**(विवेक पाटील)**
पोलीस उप आयुक्त
परि-१, पिंपरी चिंचवड